नि.दि.दावा क्र.८८८/२०१६
निशाणी क्र.६५

**वादीतर्फे सा.क्र.१ यांचा उर्वरित उलटतपास प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. आर. बी. गवळी यांच्यामार्फतः**

हे म्हणणे खरे आहे की माझ्या वडीलांचे नावे असलेले जुने घर व माडी ही मी दाव्यात सामील केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की माझा थोरला भाऊ रामदास यांचा मुंबईला ट्रान्सपोर्टचा व्यवसाय होता. हे म्हणणे खरे आहे की प्रतिवादी क्र.१ तुकाराम माझा मोठा भाऊ रामदास यांच्या सोबत त्यांच्या ट्रान्सपोर्टचा व्यवसायात काम करीत होते. हे म्हणणे खरे आहे की सन १९८७ साली रामदासने त्यांचा ट्रक तुकाराम यास दिला होता. त्यावेळी आमची बैठक झाली होती.

प्रश्न– तुकाराम १२ वर्षाचा रामदासच्या ट्रान्सपोर्ट व्यवसायात काम करीत होता म्हणुन तुकारमने त्याचा हिस्सा मागितला असता रामदासने त्यास काही दिले होते का?

उत्तर– गाडी दिली होती व तुकारामचा हिस्सा तुकारामला देऊन टाकला होता.

हे म्हणणे खरे आहे की रामदास कडे ब–याच गाडया, जीप गाडया, तसेच डोंगरी येथे दोन रुम तसेच गोडावुन होते.

प्रश्न– रामदासने ओतुर येथे त्यांच्या व्यवसायातुन ५ एकर जमीन विकत घेतली होती?

उत्तर– रामदास वेगळा झाल्यावर त्याने ती जमीन घेतली होती.

प्रश्न– रामदासने तुकारामला हिस्सा न दिल्याने तुकारामने वेगळी हरेश्वर ट्रान्सपोर्ट कॉर्पोशन या नावाने ट्रान्सपोर्ट चालु केले होते?

उत्तर– होय. तुकारामने वेगळी ट्रान्सपोर्ट कंपनी चालु केली होती.

हे म्हणणे खरे आहे की तुकारामचे ट्रान्सपोर्ट कंपनीचा व्यवसाय भरभराटीचा झाला. हे म्हणणे खरे नाही की त्यामुळे रामदासची कंपनी तोटयात गेली. हे म्हणणे खरे आहे की प्रतिवादी क्र.१ यांना अपत्य नाही. रामदास यांना कंपनीत झालेला तोटा तुकाराम यांनी भरुन काढला असेल. हे म्हणणे खरे आहे की माझ्या नावाने विकत घेतलेली गट नं.१७० मधील जमीन मी माझ्या पत्नीचा व मुलांच्या नावे त्यावेळेस केली होती.

मी गट नं.१७० जमीन माझ्या पत्नीचा व मुलांच्या नावे करताना मी माझ्या बहिणीची व भावांची परवानगी घेतली नव्हती.

हे म्हणणे खरे आहे की वडीलांच्या नावे असणारे काही जमीनी मी माझ्या नावे व रामदासने त्यांचे नावे महसुल खात्याकडून करुन घेतल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की वडिलांनी कारखान्यांच्या शेअरसाठी गट नं.१२६ ही जमीन तुकारामच्या नावे केली होती.

प्रश्न– गट नं.१२६ ही जमीन रामदासने त्यांची पत्नी व मुलांच्या नावे करुन दिली होती?

उत्तर– त्यामध्ये सगळयाची आणेवारी होती.

हे म्हणणे खरे नाही की गट नं.३११ ही जमीन ट्रान्सपोर्टच्या व्यवसायातून आलेल्या पैशामधुन माझ्या वडीलांच्या नावे घेतली होती. हे म्हणणे खरे आहे की ती जमीन रामदासने त्यांची पत्नी व मुलांच्या नावे करुन दिली होती. गट नं. १२६ व ३११ या जमिनी रामदासने त्यांच्या मुलांच्या व पत्नीच्या नावे केल्याबाबत मी तक्रार केली नाही. हे म्हणणे खरे आहे की गट नं.७३८/१९ ही माझ्या वडीलांच्या नावे असलेली जमीन रामदासने त्यांच्या नावे केली होती. मी सांगतो की त्यामध्ये सगळयाचे शेअर पडले होते. हे म्हणणे खरे आहे की सन १९७५ ते सन १९८७ येथे तुकाराम हा मालक म्हणून हरेश्वर ट्रान्सपोर्ट कंपनी येथे काम करीत होता. हे म्हणणे खरे नाही की तुकाराम यांस रामदासचे ट्रान्सपोर्ट कंपनीत काम करायला लागल्यामुळे त्याला शाळा सोडावी लागली होती. हे म्हणणे खरे नाही की गट नं.३११, ८७५, १७० व माझ्या आईचे नावे घेतलेल्या दोन जमीनी या सर्व पाच जमीनी तुकारामने त्यांने कंपनीतून कमवलेल्या उत्पन्नातून खरेदी घेतल्या होत्या. मी १३–१४ वर्षाच्या असताना अधात्मीक शिक्षण घेत होतो. रामदास मनसुक मठ येथे व आळंदी येथे मी दीड–दीड महिना होतो. हे म्हणणे खरे आहे की विवाह करण्याची माझी इच्छा नव्हती. मी सांगतो की माझा भाऊ मला म्हणाला की तु विवाह केला तरच जमीनी घेणार. हे म्हणणे खरे नाही की ट्रान्सपोर्ट व्यवसायातुन आलेले पैसे मला शेती सुधारण्यासाठी मुंबईतून पाठवले जात होते. शेतीच्या उत्पन्नातून मी पाच जमीनी खरेदी घेतल्याबाबत माझ्याकडे आता कागदोपत्री पुरावा नाही. सन १९८० नंतर ते आजपावेतो मी जमीन खरेदी घेतल्या नाही. हे म्हणणे खरे आहे की गट नं.१७० वर मी कर्ज घेतले आहे. हे म्हणणे खरे नाही की शेतीच्या नावा खाली मी प्रतिवादी क्र.१ कडुन पैसे उकळत राहिलो व त्या पैशाचा वापर मी शेतीसाठी कधीही

केला नाही. मी सांगतो की मी पैसे घेतलेच नाही.

प्रश्न– तुकारामने रामदास कडे काम करुनही पगार घेतला नाही?

उत्तर– पगार घेतला नाही. हिस्सेदारी घेतली.

हे म्हणणे खरे आहे की गट नं.१७० सोडून इतर सगळया जमीन पडीक आहे. हे मला माहित नाही की घाटकोपर येथे घर घेण्यासाठी तुकारामने माझ्या बहिण सुमित्रा हिस पैशाची मदत केली होती. हे म्हणणे खरे नाही की माझी बहिण मिराबाई हिचा विवाह तुकारामने बँकेतून कर्ज काढुन करुन दिला होता. हे म्हणणे खरे नाही की रामदास यांची मुलगी कल्पना हिस महानगर बँकेत नोकरी लावण्यासाठी तुकारामने प्रयत्न केला होता. हे म्हणणे खरे नाही की रामदासच्या दुस–या मुलीचा विवाह तुकारामने करुन दिला होता. तुकाराम यास मी आर्थिक मदत केल्याबाबत माझ्याकडे कागदोपत्री पुरावा नाही. माझ्या कुटूंबास मी आर्थिक मदत केल्याबाबत माझ्या कागदोपत्री पुरावा नाही. हे म्हणणे खरे आहे की मुंबई येथे तुकारामच्या नावे असलेला रुम रामदासने त्यांचे नावे करुन घेतला होता. हे मला सांगता येणार नाही की तुकारामने रामदास यांना तो तोटयात असताना बँकेचे कर्ज फेडण्यासाठी आर्थिक मदत केली होती किवा कसे. हे म्हणणे खरे नाही की रामदास यास  हार्ट अटॅक आल्यानंतर हॉस्पीटल, मुलाचे जेवण व साभाळ प्रतिवादी क्र.१ यांनी केला होता. हे म्हणणे खरे आहे की रामदास यांची एक पत्नी मयत होती व दुसरी पत्नी निघुन गेली होती. हे म्हणणे खरे नाही की रामदास यांच्या मुलाची पत्नीही निघुन गेली होती.

प्रश्न– रामदास यास तुम्ही आर्थिक मदत केली होती का?

उत्तर– त्यांची परिस्थिती चांगली होती. त्याला मदत करणाचा प्रश्नच नाही.

रामदास यास मी भेटायला गेलो नव्हतो.

**उलटतपास कोर्टाच्या वेळे अभावी पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/–

दिनांक : ०१/०४/२०२५

**( एन.एस.सबनीस )**
२रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर
पारनेर